# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-30.08.2026** **वार- रविवार**

---

**राज्यपाल**

देशाच्या युवा शक्तीला योग्य दिशा देण्यासाठी योगाभ्यास शाळा-महाविद्यालयांच्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवणं आवश्यक आहे असं प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलं आहे. स्वामी कुवलयानंद यांच्या १४३व्या जयंतीनिमित्त लोणावळ्यातल्या कैवल्यधाम योग संस्थेत आज झालेल्या कार्यक्रमात राज्यपाल बोलत होते. योगाच्या माध्यमातून जागतिक योग आणि आरोग्य अर्थव्यवस्था उभारण्याची भारताला मोठी संधी आहे. योग पर्यटन, प्रशिक्षण, संशोधन, डिजिटल व्यासपीठं, उपकरणं, वस्त्रं आणि विविध सेवांच्या माध्यमातून एमएसएमई, स्टार्टअप, महिला उद्योजक, कारागीर आणि स्थानिक समुदायांसाठी रोजगार आणि व्यवसायाच्या संधी निर्माण होऊ शकतात. योगाच्या माध्यमातून 'आत्मनिर्भर भारत' आणि 'विकसित भारत @२०४७' च्या उद्दिष्टांना चालना देता येईल, असं राज्यपालांनी नमूद केलं.

**कार्यशाळा**

बालकांच्या सर्वांगीण विकासाची कार्ययोजना तयार करण्यासाठी पुण्यात यशदा इथं 'बाल्यावस्थेतील प्रारंभिक विकास' या विषयावर कार्यशाळा झाली. या कार्यशाळेचं उद्घाटन आज राज्याचे मुख्य सचिव राजेशकुमार अग्रवाल यांच्या हस्ते झालं. उद्घाटनाला मुख्यमंत्र्यांचे मुख्य सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी तसंच तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते.
बाल्यावस्थेतील प्रारंभिक विकासाकडे केवळ एका विभागाचा विषय म्हणून न पाहता विविध विभागांनी एकत्रितपणे विचार करून कृती करण्याची आवश्यकता आहे, असं या कार्यशाळेची भूमिका स्पष्ट करताना डॉ. श्रीकर परदेशी म्हणाले.

**स्वतंत्रबिन शेती**

पुणे महापालिका हद्दीतल्या शेतजमिनींच्या बांधकामासाठी स्वतंत्र बिनशेती, म्हणजेच एन-ए, परवानगी घेण्याची प्रक्रिया आता रद्द करण्यात आली आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता सुधारणा अधिनियम दोन हजार पंचवीसची अंमलबजावणी महापालिकेनं सुरू केली असून आता बांधकाम विकास प्रस्ताव मंजूर करतानाच एकरकमी अकृषक रूपांतरण अधिमूल्य आकारलं जाणार आहे.

**स्वाइनफ्लू**

पुण्यात 'स्वाइन फ्लू'च्या रुग्णांमध्ये वाढ झाली आहे. जुलै महिन्यात स्वाइन फ्लूचे ३५ रुग्ण होते, ऑगस्टमध्ये ही संख्या २२५ वर गेल्याची माहिती पुणे महापालिकेच्या आरोग्य सर्वेक्षण विभागानं दिली आहे.

सध्याचा विषाणू सौम्य स्वरूपाचा असला, तरी ज्येष्ठ नागरिक आणि सहव्याधी असलेल्या रुग्णांनी विशेष खबरदारी घेणं गरजेचं आहे असं आयसीएमआर संस्थेनं सांगितलं आहे.  गर्दीच्या ठिकाणी मास्क वापरा, वारंवार हात धुवा आणि लक्षणं दिसल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या असं आवाहन वैद्यकीय तज्ज्ञांनी केलं आहे.

**प्लाझ्मासाउंड लेझर बंदी**

आगामी गणेशोत्सवाच्या काळात ध्वनीक्षेपक व्यवस्थेतील प्लाझ्मा साउंड आणि प्रखर लेझर प्रकाश झोतांच्या वापरावर पुणे ग्रामीण पोलिसांनी बंदी घातली आहे. ध्वनीपातळीच्या मर्यादेचं उल्लंघन करणाऱ्या मंडळांच्या पदाधिकाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई केली जाईल असा इशारा पोलिस अधीक्षक संदीपसिंग गिल यांनी दिला आहे. गणेशोत्सवाच्या नियोजनासाठी जिल्ह्यातल्या प्रमुख दीडशे सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या पदाधिकाऱ्यांची बैठक पुणे ग्रामीण पोलिसांनी आयोजित केली होती. या बैठकीत गणेशोत्सव शांततेत आणि नियमांचं पालन करून साजरा करण्याबाबत पोलिसांनी मंडळांना मार्गदर्शन केलं.पुण्यात गणेशोत्सव डीजेमुक्त करावा, या मागणीसाठी नागरिकांनी आज गुडलक चौकात आंदोलन केलं. गणेश मंडपांमुळे होणाऱ्या वाहतूक कोंडीबाबतही नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

**बॅडमिंटन**

पुण्यात झालेल्या कुमार गटासाठीच्या महापौर करंडक बॅडमिंटन स्पर्धेत देव रुपारेलिया यानं मुलांच्या तर इशिता नेगी हिनं मुलींच्या गटात एकेरीचं विजेतेपद मिळवलं.
मुलांच्या दुहेरीत पवन सुरेश आणि पुनीत सुरेश या जोडीनं विजेतेपद पटकावलं. मुलींच्या दुहेरीत दिया भीमैया आणि कीर्थी मंचला यांना रौप्य पदक मिळालं. मिश्र दुहेरीतही पुनीत सरेश आणि दीपक राज अदिती यांच्या जोडीला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं.

**क्रीडा जागृती**

राष्ट्रीय क्रीडा दिनानमित्त काल पुण्यात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, राष्ट्रीय एकात्मता विद्यार्थी संघटना आणि फोरसाईट कॉलेज ऑफ कॉमर्स यांनी विविध क्रीडा जनजागृतीपर प्रभातफेरी आयोजित केली होती. खेळा, निरोगी राहा आणि देशाच्या क्रीडा विकासात योगदान द्या असा संदेश यावेळी देण्यात आला. क्रीडा क्षेत्रातील विविध संधी, शारीरिक तंदुरुस्तीचं महत्त्व, नियमित व्यायाम, शिस्त आणि खेळाडूवृत्ती याबाबत या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आलं.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल २९ तर किमान २२ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. तसंच काही भागांत पावसाच्या अगदी हलक्या सरी पडल्या. उद्याही हवामान साधारण असंच असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतसह. नमस्कार.**